# जाहीर प्रकटन

या प्रकटनाव्दारे महाराष्ट्र शासनामार्फत जाहीर करण्यात येते की, कॉमनवेल्थ व्होकेशनल युनिव्हर्सिटी, पुणे. ( संस्थेचा पत्ता :- १२ बी, प्रमदिप, तिसरा मजला, सिंद हिंद सोसायटी मानिकचंद मलबार हिल समोर, गेरा स्केयर,लुल्लानगर, पुणे- ४०) या कथित शैक्षणिक संस्थेने विद्यापीठ अनुदान आयोग अथवा कोणत्याही शिखर संस्थेची परवानगी नसतांना व शासन मान्यता नसतांना नियमबाहय पध्दतीने सदर संस्थेमार्फत मानद पदव्या दिल्याचे अहवालानुसार निदर्शनास आलेले आहे. सबब, या कार्यालयाकडील आदेश दि- १३.०२.२०१९ अन्वये विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे महाराष्ट्र कृषि/पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च व तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ मधील तरतुदीचा भंग होत असल्याने संबंधित व्यवस्थापनास सदरचे कथित शैक्षणिक संस्थेत चालवित असलेले अध्ययनक्रम/अभ्यास पाठयक्रम तसेच, उपरोक्त कथित शैक्षणिक संस्था तात्काळ बंद करण्याचे आदेशित करण्यात आलेले आहे.

सबब, या कथित शैक्षणिक संस्थेत कोणत्याही अभ्यासक्रम/पाठयक्रमास विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नयेत, असे प्रवेश अनधिकृत असतील. प्रस्तुत बाब सर्व संबंधित विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना या जाहीर प्रकटनाव्दारे शासनामार्फत कळविण्यात येत आहे.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१